This is to inform our customers and public at large that our **Chandigarh Branch** located at SCO Site No. 16, Industrial Focal Point, Phase IX, S.A.S. Nagar Mohali, Chandigarh, Mohali, Rupnagar, S.A.S Nagar, Punjab - 160062 will shift to First Floor, Sco 52, Sector-29 D, Chandigarh, Chandigarh - 160030 from 22nd February 2027.

The Customers are requested to contact the new office premises for their needs.

REGIONAL BUSINESS HEAD




मराठी साहित्य, कला, संगीत आणि संस्कृती यांच्या सौंदर्याने नटलेल्या 'लोकसत्ता अभिजात लिटफेस्ट'च्या दुसऱ्या पर्वाचे उद्घाटन ख्यातनाम आणि प्रतिभावंत साहित्यिक व विचारवंत अशोक वाजपेयी यांच्या हस्ते प्रभादेवीमधील रवींद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले. या वेळी सारस्वत को-ऑपरेटीव्ह बँक लि.चे लक्ष्मण सामंत, अदाणी समूहाचे संजय पुगालिया, कौटिल्य मल्टीक्रिएशनचे मनोज चौधरी आणि वैभवलक्ष्मी बिल्डर्स आणि अँड डेव्हलपर्सचे रामदास सांगळे आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. (छाया : दीपक जोशी)

'लिटफेस्ट'च्या मंचावर काव्य-गीतांची सुरेल मैफल

ऐश्वर्यसंपन्न उत्सवाला ठाण्यातून उद्यापासून प्रारंभ

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : अभिनव आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांतून अभिजात कलांची श्रीमंती मिरवणाऱ्या 'लोकसत्ता अभिजात लिटफेस्ट' या ऐश्वर्यसंपन्न उत्सवातून हिंदुस्तानी सांगीतिक परंपरांना वाहिलेल्या शास्त्रीय संगीताच्या बैठकींबरोबरच काव्य-गीतांच्या, खास 'लिटफेस्ट'निमित्ताने निर्मिलेल्या मैफलींचा आस्वादही रसिकांना घेता येणार आहे. त्यात समावेश आहे 'उन्हातली गाणी आणि सावलीतले कवी' या काव्य-गीत-निरूपणात्मक कार्यक्रमाचा, बाल आणि कुमारवयीन मुलांबरोबरच त्यांच्या पालकांनाही बालपणीच्या आठवणींकडे घेऊन जाणाऱ्या 'बालगीतांची मैफल'चा आणि प्रसिद्ध गीतांतून चांदवा टिपणाऱ्या 'चंद्राची गाणी' या सुरेल कार्यक्रमाचा. त्यात सहभागी होणार आहेत प्रसिद्ध आणि मान्यवर कलाकार. ठाण्यातून शनिवारपासून (दि. २१) 'लिटफेस्ट'ला प्रारंभ होईल.

- मुख्य प्रायोजक : **सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**
- सहप्रस्तुती : **अदाणी**
- सहप्रायोजक : **केसरी टूर्स**
- साहाय्य : **कौटिल्य मल्टिक्रिएशन, पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, वैभवलक्ष्मी बिल्डर्स अँड डेव्हलपर्स**
- पॉवर्ड बाय : **एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विभाग महामंडळ**

प्रवेशिका कधी, कुठे ?

'उन्हातली गाणी आणि सावलीतले कवी' या कार्यक्रमासाठी ठाणे येथे बुधवारी प्रवेशिका उपलब्ध करून दिल्या होत्या. वाशी येथे होणाऱ्या 'चंद्राची गाणी' या कार्यक्रमाच्या प्रवेशिका विष्णुदास भावे नाट्यगृहात २२ नोव्हेंबरपासून उपलब्ध होतील. प्रभादेवी येथे 'बालगीतांची मैफल' या कार्यक्रमाच्या प्रवेशिका रवींद्र नाट्य मंदिरात २२ नोव्हेंबरपासून मिळतील. या कार्यक्रमास प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असून, काही जागा निमंत्रितांसाठी राखीव असतील. कार्यक्रमस्थळी १५ मिनिटे आधी न पोहोचल्यास प्रवेशिका रद्द समजल्या जातील.

'उन्हातली गाणी आणि सावलीतले कवी'



अरुणा ढेरे

'लोकसत्ता अभिजात लिटफेस्ट'ला ठाण्यातून उद्या, शनिवारपासून (दि.२१) प्रारंभ होत असून अनेक लेखक, कवी, विचारवंत, कलावंत यांना ऐकण्याची, पाहण्याची, साहित्य कलाकृती आणि साहित्यिक कार्यक्रम यांच्या मनभरून आस्वादाची संधी या ऐश्वर्यसंपन्न सोहळ्यात रसिकांना लाभणार आहे. यातील एक खास 'लिटफेस्ट'साठी निर्मित कार्यक्रम म्हणजे 'उन्हातली गाणी आणि सावलीतले कवी'. ज्येष्ठ कवयित्री डॉ. अरुणा ढेरे आणि त्यांच्या समवेत असलेला गायक-संगीतकारांचा वृंद या कार्यक्रमातून विस्मृतीत गेलेल्या अशा काही कवींच्या स्मृती जागवणार आहेत. अरुणा ढेरे यांच्या निरूपणाला प्रसिद्ध गायक मंदार आपटे, केतकी भावे-जोशी, अर्चना गोरे आणि अनिरुद्ध जोशी आदी गायक कलाकारांची साथ लाभणार आहे. शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे संध्याकाळी ७:३० ते रात्री ९:३० या वेळेत या कार्यक्रमाचे सादरीकरण होईल.

'चंद्राची गाणी'...



ऋषीकेश रानडे, शमिका भिडे

'तोच चंद्रमा नभात' हे बाबूजींचे अजरामर गीत असो वा 'चांदण्यात फिरताना' हे आशाबाईंचे प्रसिद्ध गाणे. अशा विविध गीतांमधील 'चंद्राचे' लोभस प्रतिबिंब हे श्रोत्यांना एका चंदेरी दुनियेत घेऊन जाते. अशा सुमधुर गीतांवर आधारित असणारा 'चंद्राची गाणी' हा विशेष कार्यक्रम वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात बुधवार, २५ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता होणार आहे. ही सुरेल 'चांदरात' रंगवणार आहेत प्रसिद्ध गायक ऋषिकेश रानडे, गायिका शमिका भिडे आदी कलाकार. महोत्सवातील या तिन्ही कार्यक्रमांसाठी प्रवेशिका घेणे आवश्यक आहे.

'बालगीतांची मैफल'



संगीता बर्वे

'बालगीतांची मैफल' आयोजित करण्यात आली आहे शनिवार, २८ नोव्हेंबर रोजी प्रभादेवीच्या रवींद्र नाट्य मंदिरात सकाळी ९ ते ११ या वेळेत. 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला', विंदा करंदीकरांचे 'एटू लोकांचा देश' अशा अनेक बालगीतांना स्वरांकित करणार आहे गाजलेल्या गायकांची पुढची पिढी.'उजेडाचा गाव', 'गंमत झाली भारी', 'दिवसाच्या वाटेवरून' अशा काव्यसंग्रहांतून बाल-कुमारांच्या भावभावनांना शब्द देणाऱ्या डॉ. संगीता बर्वे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहेत. पालकांनाही बालपणीच्या स्मृतींच्या हिंदोळ्यावर नेणाऱ्या या कार्यक्रमात हर्षवर्धन गोरे, वैदेही परांजपे, राज ठाकूरदेसाई, काव्या खेडेकर, श्रावणी वागळे, अथर्व कर्णिक आणि शॉना धुरंधर आदी कलाकार सादरीकरण करतील.

पुस्तक प्रकाशन आणि लेखकांशी थेट भेट

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : साहित्यसोहळ्यातील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे पुस्तक. 'लोकसत्ता अभिजात लिटफेस्ट' हा या पुस्तकांच्या गौरवाचाही उत्सव. त्यात रसिक वाचकांना ग्रंथ पाहण्याची-चाळण्याची आणि विकत घेण्याची, तसेच लेखकांना भेटण्याची संधीही लाभणार आहे. 'लोकसत्ता-लोकरंग'च्या 'वाचू आनंदे' या उपक्रमात विविध जाणकार वाचकांनी कौल दिलेली पुस्तके या काळात रसिकांना उपलब्ध असतील.

मराठीतील मान्यवर प्रकाशकांनी प्रकाशित केलेली, तसेच त्यांची गाजत असलेली ताजी पुस्तके या 'लिटफेस्ट'मध्ये वाचकांना चाळता तसेच खरेदी करता येणार आहेत. 'राजहंस', 'लोकवाङ्मयगृह', 'पॉप्युलर', 'रोहन', 'शब्दालय', 'शब्द पब्लिकेशन', 'मनोविकास', 'मॅजेस्टिक पब्लिकेशन', 'पपायरस स्टोर', 'वॉल्डन', 'देशमुख अॅण्ड कंपनी', 'समकालीन' तसेच 'पद्मगंधा' या प्रकाशन गृहांची नवी आणि वाचकप्रिय पुस्तके या सोहळ्यामध्ये उपलब्ध असतील. त्याचवेळी या प्रकाशनांच्या काही नव्या पुस्तकांचे प्रकाशन देखील या मंचावर करण्यात येईल.

ठाणे येथील 'गडकरी रंगायतन'मध्ये शनिवारी (ता. २१) संध्याकाळी पाच ते सहादरम्यान पुस्तक प्रकाशनाचा सोहळा होणार आहे. त्यात प्रसिद्ध कथाकार पंकज कुरुलकर यांच्या 'वेदनाशून्य जगण्याचा शेवट' या रोहन प्रकाशनने प्रसिद्ध केलेल्या नव्या कथासंग्रहाचे, नव्या पिढीचे लेखक-समीक्षक गणेश मतकरी यांच्या 'आठव' या मॅजेस्टिक प्रकाशनने प्रसिद्ध केलेल्या कथासंग्रहाचे, तर मनोविकास प्रकाशनने प्रसिद्ध केलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सी. ना. शिवतरकर मास्तरांना पत्रे' या लेखक विजय सुरवाडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या लेखकांशी गप्पा, संवाद तसेच नव्या पुस्तकाची लेखकाच्या सहीसह प्रत खास सवलतीत खरेदी करण्याची संधी वाचकांना लाभेल. ठाणे, मुंबईत होणाऱ्या 'लिटफेस्ट'मध्ये निवडक ठिकाणी सगळ्याच प्रकाशनांची पुस्तके हे खास आकर्षण असेल.

'वाचू आनंदे'तील पुस्तके...

राज्यातील विविध मान्यवर वाचकांनी वर्षभरात वाचलेल्या पुस्तकांची यादी दिवाळीच्या आदल्या आठवड्यात 'लोकसत्ता'च्या 'लोकरंग' पुरवणीत सादर केली जाते. चांगली पुस्तके वाचकांना निवडता यावीत, यासाठी हा उपक्रम गेली पाच-सहा वर्षे राबविण्यात येतो. 'लोकसत्ता अभिजात लिटफेस्ट'मध्ये यातील महत्त्वाची सगळीच पुस्तके वाचकांना खरेदीस उपलब्ध असतील.

इम्तियाज जलील यांना जामीन

नाशिक : टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्याचे लैंगिक शोषण, धार्मिक भावना दुखावल्याच्या गुन्ह्यातील मुख्य संशयित निदा खानला मदत केल्याच्या प्रकरणात एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांना गुरुवारी अतिरिक्त सत्र न्यायालयाने ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. निदाला मदत केल्यावरून पुरवणी दोषारोपपत्रात जलील यांच्यासह निदा खानचे कुटुंबीय, नातेवाईक आणि घरमालक यांची नावे समाविष्ट केली. गुरुवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे जाणून घेत जलील यांच्यासह सात जणांना जामीन मंजूर केला.

वाहतूक पोलीस नियंत्रण कक्षात संलग्न

ठाणे : जप्त केलेला वाहन परवाना परत मिळवून देण्यासाठी पाच हजारांची लाच घेताना अरबाज शेख (२७) या वाहतूक सहाय्यकाविरोधात (ट्रॅफिक वार्डन) ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली होती. या कारवाईनंतर मुंब्रा वाहतूक कक्षातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल अहेर यांच्यासह सुमारे ४० कर्मचाऱ्यांना नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आले. मुंब्रा वाहतूक कक्षाची जबाबदारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गौरी मोरे यांना देण्यात आली आहे.

GODREJ CONSUMER PRODUCTS

GODREJ CONSUMER PRODUCTS LIMITED
CIN: L24246MH2000PLC129806
Registered Office: Godrej One, 4th Floor, Pirojshanagar, Eastern Express Highway, Vikhroli (East), Mumbai - 400 079, Maharashtra, India
Tel No.: 022 – 2518 8010; **Fax No.:** 022- 2518 8040
Website: www.godrejcp.com; **Email:** investor.relations@godrejcp.com

NOTICE TO THE SHAREHOLDERS OF THE COMPANY FOR TRANSFER OF EQUITY SHARES TO THE INVESTOR EDUCATION AND PROTECTION FUND (IEPF) ACCOUNT

In terms of requirements of Section 124(6) of the Companies Act, 2013 read with Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016 ("the Rules") [including any modification(s) / amendment(s) / re-enactment(s) thereto], the Company is required to transfer the shares, in respect of which the dividend remains unpaid or unclaimed for a period of 7 (seven) consecutive years, to the IEPF Account established by the Central Government.

Notice is further given that MUFG Intime India Private Limited (formerly Link Intime India Private Limited), RTA of the Company is sending individual communication to the concerned Shareholders at their last known/registered address available with the RTA of the Company, whose dividends have remained unpaid or unclaimed for 7 (seven) consecutive years, and whose shares are liable to be transferred to IEPF Account on or before **March 5, 2027**. A list of such Shareholders who have not encashed their dividends for 7 (seven) consecutive years and whose Equity Shares are therefore liable for transfer to the IEPF Account is available on the website of the Company at https://www.godrejcp.com/investors/investor-information/unclaimed-dividend

Shareholders are requested to forward the requisite documents, as per the above-mentioned communication, to the Company's Registrar and Share Transfer Agent (RTA) viz. MUFG Intime India Private Limited to claim the unclaimed dividend amount(s) and Equity Shares on or before **February 5, 2027**.

Notice is hereby given that in the absence of receipt of a valid claim by the Shareholders, the Company would be transferring the said Equity Shares to IEPF Account without further notice in accordance with the requirement of the said Rules, by following the stipulated process.

The concerned Shareholders may note that, once the Equity Shares are transferred to the demat account of IEPF Authority, no claim shall lie against the Company in respect of unpaid or unclaimed dividend amount(s) and Equity Shares transferred to IEPF pursuant to the said Rules.

Please note that after such transfer, Shareholders can claim the said Equity Shares along with unpaid or unclaimed dividend(s) from IEPF, for which details are available at www.iepf.gov.in. The Shareholders may further note that the details uploaded by the Company on the website shall be deemed to be an adequate notice in respect of the transfer of shares to IEPF for compliance with the Rules.

For any information or clarifications on this matter, the concerned Shareholders/Claimants may write to the Company at investor.relations@godrejcp.com or to the RTA, MUFG Intime India Private Limited (formerly Link Intime India Private Limited), C-101, Embassy 247, LBS Marg, Vikhroli (West), Mumbai – 400083, Tel: +91 810 811 6767; Email: investor.helpdesk@in.mpms.mufg.com

For Godrej Consumer Products Limited
Sd/-
Tejal Jariwala
Company Secretary & Compliance Officer
(FCS 9817)

Date: November 19, 2026
Place: Mumbai

ओरिएंटल ॲरोमॅटिक्स लि.

सीआयएन : L17299MH1972PLC285731
नोंदणीकृत कार्यालय : १३३, जहांगीर बिल्डिंग, दुसरा मजला, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई-४००००१.
फोन नं : ०२२-४३२१४०००; **फॅक्स** : ०२२-४३२१४०९९
वेबसाइट : www.orientalaromatics.com, **ईमेल** : investors@orientalaromatics.com

टपाल मतपत्रिका आणि दूरस्थ ई-मतदान माहितीची सूचना

प्रिय सदस्यांनो,

१. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३च्या कलम १०८, ११० आणि इतर लागू तरतुदी असल्यास, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४सह वाचन करून, तसेच भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५च्या नियम ४४ अन्वये आणि एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनात, कंपनीने १९ नोव्हेंबर, २०२६ रोजी दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२६च्या स्पष्टीकरणात्मक निवेदनासह टपाल मतपत्रिका सूचना ("टपाल मतपत्रिका सूचना") पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. ही सूचना त्या सदस्यांना पाठवण्यात आली होती ज्यांचे ईमेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंटकडे नोंदणीकृत आहेत, उदा. एमयूएफजी इंटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि ज्यांची नावे शुक्रवार, १३ नोव्हेंबर, २०२६ रोजी ("कट-ऑफ तारीख") सभासदांच्या नोंदवहीमध्ये/लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये आहेत, त्यांना पोस्टल बॅलेट सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायासाठी, केवळ दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे पोस्टल बॅलेटद्वारे कंपनीच्या सभासदांची मंजुरी मिळवण्यासाठी अर्ज करता येईल. ही सूचना कंपनीच्या www.orientalaromatics.com या वेबसाइटवर, ई-मतदान एजन्सीच्या https://www.evoting.nsdl.com/या वेबसाइटवर आणि ज्या स्टॉक एक्स्चेंजवर कंपनीचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध आहेत, म्हणजेच बीएसई लिमिटेड www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com, या स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

२. कंपनीने दूरस्थ ई-मतदान सुविधा पुरवण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज अँड डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) या अधिकृत संस्थेची सेवा घेतली आहे. सदस्यांनी नोंद घ्यावी की, दूरस्थ ई-मतदान **शनिवार, २१ नोव्हेंबर, २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळ)** सुरू होईल आणि **रविवार, २० डिसेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भारतीय प्रमाण वेळ)** संपेल. सदस्यांना नमूद केलेल्या तारखेनंतर आणि वेळेनंतर मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही. केवळ तेच सदस्य, ज्यांची नावे अंतिम तारखेपर्यंत कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सद्वारे ठेवलेल्या सदस्य नोंदवही/लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये आहेत, तेच दूरस्थ ई-मतदानाद्वारे आपले मत देण्यास पात्र असतील.

३. ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स किंवा रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट यांच्याकडे नोंदणीकृत नाहीत, ते खालील प्रक्रिया वापरून त्यांचे ई-मेल आयडी नोंदवू शकतात :
   - **ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स आहेत,** ते कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट म्हणजेच एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एमयूएफजी) यांना investor.helpdesk@in.mpms.mufg.com या पत्त्यावर ई-मेल पाठवून आपला ई-मेल पत्ता कंपनीकडे नोंदवू शकतात.
   - **डिमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणारे सदस्य** केवळ त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडेच त्यांच्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी करू शकतात.

४. **ज्या भागधारकांचे ईमेल आयडी डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत नाहीत, त्यांच्यासाठी युझर आयडी आणि पासवर्ड मिळवण्याची आणि या सूचनेत नमूद केलेल्या ठरावांवरील ई-मतदानासाठी ईमेल आयडीची नोंदणी करण्याची प्रक्रिया :**
   - शेअर्स प्रत्यक्ष स्वरूपात असल्यास, कृपया फोलिओ क्रमांक, शेअरधारकाचे नाव, शेअर प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत (पुढील आणि मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत) investors@orientalaromatics.com या ईमेलवर पाठवा.
   - शेअर्स डिमॅट मोडमध्ये असल्यास, कृपया डीपीआयडी-सीएलआयडी (१६ अंकी डीपीआयडी + सीएलआयडी किंवा १६ अंकी लाभार्थी आयडी), नाव, क्लायंट मास्टर किंवा एकत्रित खाते विवरणाची प्रत, पॅन (पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत) investors@orientalaromatics.com वर पाठवा.

५. कंपनीच्या संचालक मंडळाने दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेद्वारे झालेल्या मतदानाची निष्पक्ष आणि पारदर्शकपणे छाननी करण्यासाठी सीएस श्रेयंस जैन, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, मुंबई (सदस्यत्व क्रमांक FCS 8519 आणि प्रॅक्टिस प्रमाणपत्र क्रमांक 9801) यांची छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

६. पोस्टल बॅलेटचा निकाल **मंगळवार, २२ डिसेंबर २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी अध्यक्ष किंवा अध्यक्षांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारे जाहीर केला जाईल आणि ज्या स्टॉक एक्स्चेंजवर कंपनीचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध आहेत, त्यांना त्याची माहिती दिली जाईल. सदस्यांच्या माहितीसाठी हा निकाल कंपनीच्या www.orientalaromatics.com या वेबसाइटवर आणि www.evoting.nsdl.com वरदेखील प्रदर्शित केला जाईल.

७. रिमोट ई-व्होटिंगद्वारे पोस्टल बॅलेटशी संबंधित कोणतेही प्रश्न/तक्रारी, कंपनीच्या कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर, सुश्री किरणप्रीत गिल, ओरिएंटल ॲरोमॅटिक्स लिमिटेड, १३३, जहांगीर बिल्डिंग, दुसरा मजला, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे किंवा investors@orientalaromatics.com वर ई-मेल पाठवून कळवता येतील.
तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले भागधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि भागधारकांसाठी ई-व्होटिंग वापरकर्ता मॅन्युअलदेखील पाहू शकता किंवा ०२२-४८८६७००० या टोल फ्री क्रमांकावर कॉल करू शकता किंवा evoting@nsdl.com वर विनंती पाठवू शकता.

ओरिएंटल ॲरोमॅटिक्स लिमिटेडसाठी
एसडी/-
किरणप्रीत गिल
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

दिनांक : १९ नोव्हेंबर, २०२६
ठिकाण : मुंबई

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणासमोर,
मुंबई खंडपीठ, न्यायालय III
सी.पी. (CAA)/१२/MB/२०२६
मध्ये
सी.ए. (CAA)/१२४/MB/२०२५
कंपनी अधिनियम, २०१३ च्या संदर्भात;
आणि
कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ सह कलम ६६ आणि इतर लागू तरतुदी तसेच कंपनीज (तडजोडी, व्यवस्था आणि विलीनीकरण) नियम, २०१६ यांच्या संदर्भात;
आणि
बिलीफ इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड ("प्रथम याचिकाकर्ता कंपनी" किंवा "हस्तांतरक कंपनी") यांचे हाय ग्रेड इंडस्ट्रीज (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड ("द्वितीय याचिकाकर्ता कंपनी" किंवा "हस्तांतरिती कंपनी") यांच्यामध्ये तसेच त्यांच्या संबंधित भागधारकांसह विलीनीकरणाच्या योजनेच्या संदर्भात.

बिलीफ इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड
CIN: U65990MH1996PTC098254, नोंदणीकृत कार्यालय : २३०२, २३ वा मजला, लोटस सिग्नेचर, वीरा देसाई रोडजवळ, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३.
...... ('प्रथम याचिकाकर्ता कंपनी' किंवा 'हस्तांतरक कंपनी')

हाय ग्रेड इंडस्ट्रीज (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड
CIN: U24110MH2000PTC128609, नोंदणीकृत कार्यालय : २३०२, २३ वा मजला, लोटस सिग्नेचर, वीरा देसाई रोडजवळ, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३.
...... ('द्वितीय याचिकाकर्ता कंपनी' किंवा 'हस्तांतरिती कंपनी')

याचिकेच्या सुनावणीची नोटीस

याद्वारे जाहीर करण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम २३० ते २३२ सह कलम ६६ अन्वये, बिलीफ इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड ("प्रथम याचिकाकर्ता कंपनी" किंवा "हस्तांतरक कंपनी") यांचे हाय ग्रेड इंडस्ट्रीज (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड ("द्वितीय याचिकाकर्ता कंपनी" किंवा "हस्तांतरिती कंपनी") यांच्यामध्ये तसेच त्यांच्या संबंधित भागधारकांसह विलीनीकरणाच्या योजनेस ("सदर योजना") मंजुरी देण्याचा आदेश पारित करण्यासाठीची याचिका, वरील नमूद याचिकाकर्त्या कंपन्यांनी संयुक्तपणे मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ ("मा. न्यायाधिकरण") यांच्यासमोर दाखल केली आहे. सदर याचिका न्यायाधिकरणासमोर मंगळवार, दिनांक ५ जानेवारी २०२७ रोजी किंवा त्यानंतर लवकरच सुनावणीसाठी निश्चित करण्यात येणार आहे.

सदर याचिकेस समर्थन देण्याची किंवा विरोध करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपला हेतू दर्शविणारी लेखी नोटीस, स्वतःच्या किंवा आपल्या वकिलाच्या स्वाक्षरीसह, स्वतःचे संपूर्ण नाव व पत्ता नमूद करून, खाली नमूद केलेल्या याचिकाकर्त्या कंपन्यांच्या अधिकृत प्रतिनिधीकडे तसेच न्यायाधिकरणाकडे, चौथा मजला, टेलिफोन एक्स्चेंज, जी. डी. सोमाणी रोड, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४००००५ येथे पाठवावी. सदर नोटीस याचिकेच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या तारखेच्या किमान दोन दिवस आधी याचिकाकर्त्या कंपन्यांच्या अधिकृत प्रतिनिधीकडे पोहोचणे आवश्यक आहे. याचिकेस विरोध करण्याची इच्छा असल्यास, विरोधाची कारणे किंवा त्या संदर्भातील प्रतिज्ञापत्राची प्रत सदर नोटिशीसोबत सादर करणे आवश्यक आहे.

याचिकेची प्रत तसेच त्यासोबतची सर्व परिशिष्टे, मागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस निर्धारित शुल्क भरल्यानंतर, याचिकाकर्त्या कंपन्यांच्या अधिकृत प्रतिनिधीकडून कोणत्याही कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्या वगळून) सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत उपलब्ध करून देण्यात येतील. तथापि, सदर याचिकेच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या तारखेच्या किमान २ (दोन) दिवस आधीपर्यंतच ही प्रत उपलब्ध करून दिली जाईल.

दिनांक : २० नोव्हेंबर २०२६
ठिकाण : मुंबई

सही/-
राजवीरेंद्र सिंह राजपुरोहित
प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज
याचिकाकर्त्या कंपन्यांचे अधिकृत प्रतिनिधी
बी/२०५, इमारत क्र. २, वेंकटेश्वर नगर, केबिन रोड, भाईंदर पूर्व, ठाणे ४०११०५.

प्लॅटिनम

प्लॅटिनम इंडस्ट्रीज लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालयः २०१, आकृती स्टार, पॉकेट नं. ५, सेंट्रल रोड, एमआयडीसी, मरोळ, अंधेरी पूर्व, मुंबई- ४०००६९.
कॉर्पोरेट ओळख क्रमांक (सीआयएन): L24299MH2020PLC341637 |
दूरध्वनी: ०२२-६९९८३९००/ ६९९८३९९९
ई-मेलः compliance@platinumindustriesltd.com |
वेबसाइटः www.platinumindustriesltd.com

टपाल मतपत्रिका आणि ई-मतदान माहितीची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्लॅटिनम इंडस्ट्रीज लिमिटेड ('कंपनी') खालील ठरावावर दूरस्थ ई-मतदानाच्या माध्यमातून टपाल मतपत्रिकेद्वारे कंपनीच्या भागधारकांची मंजुरी मिळवू इच्छित आहेः

अनु. क्र.	ठरावाचा प्रकार	ठरावाचे वर्णन
१.	विशेष ठराव	कंपनीची उपकंपनी असलेल्या मे. रिवादू लाईफसायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड, ज्यामध्ये एका संचालकाचा हितसंबंध आहे, तिच्याद्वारे घेतल्या जाणाऱ्या कर्ज आणि वित्तीय सुविधांच्या संदर्भात कर्ज/ आंतर-कॉर्पोरेट ठेव मंजूर करणे आणि कॉर्पोरेट हमी प्रदान करणे.
२.	सामान्य ठराव	मे. रिवादू लाईफसायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासोबत झालेले महत्त्वपूर्ण संबंधित पक्षांचे व्यवहार.

कंपनी कायदा, २०१३च्या तरतुदींनुसार, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४चे नियम २० आणि २२, भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियम, २०१५चा नियम ४४, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेले सर्वसाधारण सभांवरील सेक्रेटरियल स्टँडर्ड (''एसएस २''), किंवा भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (''एमसीए''), इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे मतदानाद्वारे पोस्टल बॅलेट प्रक्रिया आयोजित करण्यासाठी विहित केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल, २०२०, १७/२०२० दिनांक १३ एप्रिल, २०२०, आणि या संदर्भात जारी केलेली त्यानंतरची परिपत्रके, ज्यापैकी सर्वात नवीन परिपत्रक सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ आहे (एकत्रितपणे, ''एमसीए परिपत्रके''); या सूचनेत नमूद केलेले ठराव कंपनीच्या सदस्यांकडून केवळ टपाल मतपत्रिकेद्वारे इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून मतदान करून (''रिमोट ई-व्होटिंग'') मंजुरीसाठी प्रस्तावित आहेत. कंपनीने सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग सुविधा पुरवण्यासाठी मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (''बिगशेअर'' किंवा ''सेवा प्रदाता'') यांची नियुक्ती केली आहे, ज्यामुळे ते इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आणि सुरक्षितपणे आपले मत देऊ शकतील.

दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२६च्या पोस्टल बॅलेट सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक प्रती, स्पष्टीकरणात्मक विवरणासह आणि सूचनेत नमूद केलेल्या ई-मतदानाच्या सविस्तर प्रक्रियेसह, त्या भागधारकांना ईमेलद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवण्यात आल्या आहेत, ज्यांनी कंपनी आणि/ किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे त्यांचे ईमेल आयडी नोंदवले आहेत आणि ज्यांची नावे मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (''आरटीए'')कडून प्राप्त झालेल्या **शुक्रवार, १३ नोव्हेंबर, २०२६ (''कट-ऑफ तारीख'')** रोजी सभासदांच्या नोंदवहीमध्ये किंवा लाभधारक मालकांच्या यादीमध्ये नोंदवलेली आहेत. हे भागधारक दूरस्थ ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असतील. सभासदांना ई-मेलद्वारे पोस्टल बॅलेटची सूचना पाठवण्याची अंतिम तारीख **गुरुवार, १९ नोव्हेंबर, २०२६** आहे. या पोस्टल बॅलेटसाठी सूचनेच्या भौतिक प्रती, पोस्टल बॅलेट फॉर्म आणि प्रीपेड बिझनेस रिप्लाय लिफाफा सभासदांना पाठवला जात नाही.

पोस्टल बॅलेटची सूचना आणि ई-मतदानाची पद्धत कंपनीच्या www.platinumindustriesltd.com या वेबसाइटवर आणि ज्या स्टॉक एक्स्चेंजवर कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत, म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com या वेबसाइटवर, तसेच मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या https://ivote.bigshareonline.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

दूरस्थ ई-मतदान सुविधा खालील कालावधीत उपलब्ध असेलः

दूरस्थ ई-मतदानाचा प्रारंभ	**शुक्रवार, २० नोव्हेंबर, २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार)**
दूरस्थ ई-मतदानाचा निष्कर्ष	**शनिवार, १९ डिसेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार)**

बिगशेअरतर्फे **शनिवार, १९ डिसेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजल्यानंतर** ई-मतदान प्रणाली मतदानासाठी बंद केली जाईल. एकदा सदस्याने ठरावावर मत दिल्यानंतर, त्यांना नंतर ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. नमूद केलेल्या तारखेनंतर सदस्याकडून टपाल मतपत्रिकेसाठी मिळालेली कोणतीही संमती किंवा विरोध वैध मानला जाणार नाही आणि नमूद केलेल्या तारखेनंतर व वेळेनंतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानास परवानगी दिली जाणार नाही.

ज्या सदस्यांनी त्यांच्या ईमेल पत्त्यांची नोंदणी केलेली नाही, ते सूचना आणि ई-मतदान क्रेडेन्शियल्स मिळवण्यासाठी खालीलप्रमाणे नोंदणी करू शकतातः

(अ) प्रत्यक्ष स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी, फोलिओ क्रमांक, शेअरधारकाचे नाव, ई-मेलद्वारे किंवा आरटीएला cs@platinumindustriesltd.com https://www.bigshareonline.com / InvestorRegistration.aspx वर देऊन आणि (ब) डिमॅट स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी, त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे ईमेल पत्ता नोंदणी/ अद्ययावत करून, किंवा डीपी आयडी- क्लायंट आयडी, शेअरधारकाचे नाव, ई-मेलद्वारे cs@platinumindustriesltd.com वर किंवा वर नमूद केलेल्या लिंकवर आरटीएला द्यावीत.

कंपनीने टपाल मतपत्रिका आणि दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी मे. मयंक अरोरा अँड कंपनी, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज (सीएस मयंक अरोरा, एफसीएस १०३७८, सीओपी १३६०९ यांच्यामार्फत प्रतिनिधित्व), ज्यांचा पत्ता २रा मजला, ए विंग, द सजय बिझनेस हब, अरसा हॉटेलसमोर, अंधेरी मेट्रो गेट क्र. २ जवळ, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००६९, महाराष्ट्र, भारत, असा आहे, यांची छाननीकर्ता म्हणून नियुक्ती केली आहे.

छाननी अहवालासह जाहीर झालेले निकाल, कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध असलेल्या स्टॉक एक्सचेंजेसना, म्हणजेच बीएसई लिमिटेड www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com यांना कळवले जातील, आणि सेबी एलओडीआर नियमांच्या तरतुदींनुसार, ई-मतदान कालावधी संपल्यापासून २ (दोन) कामकाजाच्या दिवसांच्या आत, म्हणजेच **मंगळवार, २२ डिसेंबर, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी, कंपनीच्या www.platinumindustriesltd.com या वेबसाइटवर आणि मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या https://ivote.bigshareonline.com या वेबसाइटवर देखील प्रदर्शित केले जातील. पोस्टल बॅलेटचा निकाल कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातही प्रदर्शित केला जाईल.

रिमोट ई-व्होटिंगद्वारे पोस्टल बॅलेटबाबत काही प्रश्न असल्यास, तुम्ही https://ivote.bigshareonline.com वर डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न (''एफएक्यूज'') आणि आय-व्होट ई-व्होटिंग मॉड्यूल पाहू शकता किंवा ivote@bigshareonline.com वर ई-मेल लिहू शकता किंवा टेलः ०२२-६२६३८२०० वर संपर्क साधू शकता किंवा कोणत्याही तक्रारी श्री. प्रशांत एस. गावकर, व्यवस्थापक, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, ऑफिस क्रमांक एस६-२, ६वा मजला, पिनाकल बिझनेस पार्क, अहुरा सेंटरच्या पुढे, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००९३; ई-मेलः evcservices@bigshareonline.com; दूरध्वनीः ७५०६०७११७२ यांना कळवाव्यात.

प्लॅटिनम इंडस्ट्रीज लिमिटेडसाठी
सही/-
कृष्णा दुष्यंत राणा
व्यवस्थापकीय संचालक
(DIN: 02071912)
ठिकाणः मुंबई
दिनांकः १९ नोव्हेंबर, २०२६